।। स्वच्छ घर, सुंदर परिसर, शौचालयाचा करूया वापर ।।

# ग्रामपंचायत अंजनगांव

ता. बारामती, जि. पुणे.

स्वच्छ भारत
एक पाऊल स्वच्छतेकडे

सौ. निलम मिलिंद मोरे
उपसरपंच
मो.९८९०३३५००८

सौ. प्रतिभा दिलीप परकाळे
सरपंच
मो.९४२२५१६४४०

जावक क्र.

दिनांक : / /२०२

ग्रामपंचायत अंजनगाव ता.बारामती जि.पुणे
जा.क्र.
दि.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित सात दिवस निवासी विशेष श्रम संस्कार शिबिर शिबिर आमच्या गावी(मौजे अंजनगाव ) दिनांक २१ ते २७ डिसेंबर २०२३ रोजी यशस्वीरित्या राबवण्यात आले. सदर शिबिराच्या माध्यमातून मौजे अंजनगाव ग्रामपंचायत हद्दीत ग्राम स्वच्छता, रस्ता दुरुस्ती, रस्त्याच्या कडेला साईड पाटील नवनिर्मिती तसेच स्मशानभूमी परिसर स्वच्छता, वृक्षरोपण व वृक्ष संवर्धनाचे (आळी करणे) कार्य करण्यात आले.

सदर शिबिराच्या माध्यमातून १० ते १२ लाख रुपयांची कामे झाली तसेच येणाऱ्या पाच वर्षाच्यां कालावधीमध्ये निर्माण केलेल्या चिंच बनाच्या माध्यमातून पाच हजार रुपये प्रति चिंच या मानाने ६०० चिंचेच्या झाडांच्या माध्यमातून २५ लाख रुपयाची वार्षिक उत्पन्न प्रति वर्षी अंजनगाव ग्रामपंचायतीस प्राप्त होईल अशा कायमस्वरूपीची तरतूद करण्यात आली आहे. संपूर्ण आरोग्य शिबिर, दंतचिकित्सा शिबिर व गाव पातळीवरील अंजनगाव परिसरातील ''राजकीय व आर्थिक अभ्यास'' सर्वेक्षण करून ५१७ कुटुंबाची माहिती विद्यार्थ्यांनी संकलित करून ग्रामपंचायत कार्यालयात जमा केली. शिबीर कालावधीमध्ये अवयदानाचे महत्व , ग्रामीण उद्योजकता पूरक कृषी पर्यटन मार्गदर्शन पर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. स्वयंसेवकांच्या माध्यमातून लोकशाही सबलीकरण , लोकसंख्या नियंत्रण रॅली व पथनाट्यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. महाविद्यालयातील एकूण १०० मुली ८२ मुले असे १८२ विद्यार्थी सहभागी झाले होते.

ग्राम स्वच्छता, गावातील मंदिर परिसर स्वच्छता, समाज मंदिर परिसर स्वच्छता व ग्रामस्थांशी मुक्त संवाद तसेच महिला ग्रामस्थांसाठी हा खेळ पैठणीचा या माध्यमातून मौजे अंजनगाव ग्रामपंचायत व ग्रामस्थांना या शिबिराची प्रगतीपथात अग्रगण्य होण्यास निश्चित मदत होईल,या शिबिरात डॉ. विलास कर्डिले, डॉ. चंद्रकांत कांबळे डॉ. निरंजन शहा व प्राध्यापिका अस्मिता भगत व त्यांचे सहकारी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. सदर शिबिर आमच्या गावामध्ये आयोजित केल्याबद्दल राष्ट्रीय सेवा योजना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांचे मनस्वी आभार.

सदर माहिती आपल्या मागणीनुसार देत आहोत.

धन्यवाद!

ग्रामसेवक
ग्रामपंचायत अंजनगाव
ता.बारामती,जि.पुणे

P. D. Parkale
सरपंच
ग्रामपंचायत अंजनगाव
ता.बारामती,जि.पुणे
सरपंच

ग्रामपंचायत मौजे अंजनगाव शिक्का

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना
## विशेष शिबिर सदिच्छा भेट
### सन – 2023 - 2024

दिनांक: २८/१२/२०२३

१. महाविद्यालयाचे नांव : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

२. रासेयो कार्यक्रम अधिकारी नांव डॉ. विलास कर्डिले ...... मो. ९८८०४८८९६३

३. विशेष शिबिराचे ठिकाण : अंजनगाव, ता. बारामती, पुणे.

४. दिनांक : २१/१२/२०२३ ते २७/१२/२०२३ पर्यंत

५. महाविद्यालयापासून शिबिर ठिकाणाचे अंतर १४ कि.मी.

६. सन. २०२३–२४ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांचे मंजूर एककसंख्या ३००

७. नियमित ३०० विद्यार्थी १२० विद्यार्थीनी १८० एकुण ३००

८. नियमित विद्यार्थी वर्गवारीनुसार ST ०२ SC ४२ Other ५७ Open १९४

९. विशेष शिबिर मंजूर संख्या १५० विद्यार्थी ९० विद्यार्थीनी ९७ एकुण १८७

१०. विशेष शिबिर विद्यार्थी सहभाग वर्गवारीनुसार ST ०२ SC २२ Other ३७ Open १२६

११. विशेष शिबिर प्रत्यक्ष उपस्थिती

विद्यार्थी ९० विद्यार्थीनी ९७ एकुण १८७

१२. शिबिरात झालेले प्रत्यक्ष काम ग्राम स्वच्छता, वृक्षारोपण, स्मशान भूमि स्वच्छता, व सुशोभीकरण, रस्ता निर्मिती, [illegible] निर्माण सामाजिक आर्थिक सर्वेक्षण, जनजागृती.

१३. इतर नाविण्यपूर्ण उपक्रम ग्रामीण उद्योजकता वृद्धिगत होण्याकरिता प्रोत्साहन पर कार्यक्रम

रासेयो कार्यक्रम अधिकारी

रासेयो विभाग समन्वयक

रासेयो जिल्हा समन्वयक

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

Principal
Tuljaram Chaturchand College

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**विशेष शिबिर दत्तक गांव माहिती फॉर्म**
**सन – 2023 - 2024**

दिनांक: २४ / १२ / २०२३

१. महाविद्यालयाचे नांव : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

२. रासेयो कार्यक्रम अधिकारी नांव डॉ. विकास काकडे मो. 9960444343

३. विशेष शिबिराचे ठिकाण : अंजनगाव तालुका बारामती जिल्हा पुणे

४. विशेष शिबिर दिनांक : २०/१२/२०२३ ते २६/१२/२०२४ पर्यंत

५. महाविद्यालयापासून शिबिर ठिकाणाचे अंतर १४ कि.मी.

६. एकूण लोकसंख्या २२५० पैकी स्त्रीसंख्या ११२० पुरुष संख्या ११३०

७. दत्तक गावाचे एकूण क्षेत्रफळ 3360 H.ec पैकी शेती लागवडीखालील क्षेत्र 2352 Hect

८. दत्तक गावास पाणीपुरवठा होणारा स्त्रोत जड (विहीर) एकूण पाणीसाठा —

नळ असल्यास एकूण संख्या ४५५ हातपंप संख्या २२

९. दत्तक गावातील एकूण वृक्षांची संख्या (अंदाजे) १,२३,७०५ अंदाजे

१०. दत्तक गावांतील शैक्षणिक संस्थांची माहिती सोमेश्वर (वयस्कुल), अंजनगाव

एकूण प्राथ. शाळा ०२, माध्यमिक शाळा ०१ महाविद्यालये —

११. दत्तक गावातील एकूण युवा लोकसंख्येपैकी साक्षरांची संख्या (महिला व पुरुष %) ९८, ९८%

१२. दत्तक गावांतील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची माहिती (स्थापनावर्ष) २५.८८, औरंगनाथ मंदिर (अंदाजे), (१८५०) विठ्ठल रखुमाई मंदिर

१३. दत्तक गावातील जास्तीत जास्त लोकसंख्येच्या उपजीविकेचे साधन शेती

१४. शिबिर काळात झालेल्या प्रत्यक्ष कामाची थोडक्यात माहिती ग्राम स्वच्छता, रस्ता निर्मिती, आर्थिक पहाणी, सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण, वृक्षारोपण, चिंचकाम, स्मशानभूमी परिसर स्वच्छता व सुशोभीकरण.

१५. शिबिर काळात केलेल्या नाविण्यपूर्ण उपक्रमांची माहिती ग्राम उद्योजकता वृद्धिंगत होण्यासाठी चालना

१६. दत्तक गावांतील रुग्णालये — अनाथआश्रम — दत्तक गावाला मिळालेला पुरस्कार व वर्ष नाही

रासेयो कार्यक्रम अधिकारी

रासेयो विभाग समन्वयक

रासेयो जिल्हा समन्वयक

मा. प्राचार्य

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

व

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

(कला, विज्ञान व वाणिज्य)

स्वायत्त

नॅक मुल्यांकीत 'A+' ग्रेड

राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.बी.–०३२)

# विशेष श्रमसंस्कार शिबीर

प्राचार्य

डॉ. अविनाश जगताप

(तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती)

## अहवाल २०२३–२४

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

(कला, विज्ञान व वाणिज्य) स्वायत्त

## राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.बी.–०३२)

## विशेष श्रमसंस्कार शिबीर अहवाल २०२३–२४

डॉ. विलास कर्डिले
डॉ. चंद्रकांत कांबळे
डॉ. निरंजन शहा

**शिबीराचे ठिकाण: मौजे अंजनगाव ◆ कालावधी: २१ ते २७ डिसेंबर २०२३**

राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व राष्ट्रीय सेवा योजना तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती यांचे संयुक्त विद्यमाने विशेष श्रमसंस्कार शिबीर दि.२१ ते २७ डिसेंबर २०२३ या कालावधीमध्ये दत्तक गाव मौजे अंजनगाव, ता.बारामती जि.पुणे येथे (७७ मुले व १०२मुली) एकूण १७९ स्वंयसेवकांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

**उद्घाटन:**

शिबीराचे उद्घाटन गुरुवार दि. २२ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ११.००वा. मा.डॉ.अविनाश जगताप , प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती यांच्या अध्यक्षतेत व सौ. प्रतिभाताई दिलीप परकाळे, सरपंच, सौ.नीलम मिलिंद मोरे, उपसरपंच, अंजनगाव ग्रामपंचायत, उद्योजक सुरेश परकाळे, श्री. दादासाहेब मोरे, संचालक, सोमेश्वर कारखाना, श्री. सुभाष परकाळे, श्री. सुभाष वायसे, श्री. दिलीप परकाळे, श्री. संजय परकाळे, श्री.जालिंदर वायसे, श्री. मिलिंद मोरे व सौ. मिनाज मुलानी , ग्रामसेवक सर्व आजी -माजी पदाधिकारी, समस्त ग्रामस्थ अंजनगाव, महाविद्यालयाचे उपप्राचार्य मा.डॉ. अशोक काळंगे , रजिस्ट्रार श्री. अभिनंदन शहा व कार्यक्रम अधिकारी, ग्रामस्थ, शिबीरार्थी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

'युवकांचा ध्यास ग्राम – शहर विकास','लोकसंख्या नियंत्रण जनजागृती' ही संकल्पना समोर ठेवून शिबीर काळात गाव परिसराची स्वच्छता, रस्त्याच्या कडेचे दगड, गवत, सपाटीकरण, अनावश्यक काटेरी झाडे, समाजमंदिर, भैरवनाथ मंदिर, सोमेश्वर हायस्कूल व जिल्हा परिषद शाळा समोरील परिसर, वृक्षाना आळी करणे, ग्रामस्वच्छता, प्लॅस्टीक मुक्ती अभियान , 'लोकसंख्या नियंत्रण जनजागृती, मतदार जनजागृती रॅली, अंजनगाव सामाजिक – आर्थिक–राजकीय अभ्यास सर्वेक्षण इ. उपक्रम राबविण्यात आले.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE
BARAMATI

१. शिबीर काळातील श्रमदान:

अ) कऱ्हा नदी पुलावरील रस्ता वरील खड्डे बुजवणे व साईड पट्टी निर्मिती :

श्रमदान हे श्रेष्ठ दान समजले जाते व श्रमाला प्रतिष्ठा मिळावी तसेच स्वयंसेवकानाही ग्रामविकासामध्ये जास्तीत जास्त सहभाग घेता यावा यासाठी अंजनगाव परिसरात कऱ्हा नदीवर असणाऱ्या पुलास जोडला जाणारा रस्ता कऱ्हा नदीवरील बंधारा फुटल्यामुळे नादुरुस्त झाला होता. सदर रस्त्याचा काही भाग वाहून गेला होता. हा रस्ता कऱ्हावागज मार्गे अंजनगावास पुणे व बारामती मुख्य रस्त्यास जोडत असल्यामुळे त्याचे गावकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचा भाग होता. सदर रस्ता (१.५ किलोमीटर) निर्माण व त्याच्या कडेला असणाऱ्या साईड पट्टी निर्मिती करण्यात आली. गावकऱ्यांनी सदर उपक्रमाचे अतिशय कौतुक केले

ब) वृक्षरोपन व वृक्ष संवर्धन:

वृक्षरोपन व संवर्धन ही काळाची गरज लक्षात घेवून अंजनगाव परिसरामध्ये पूर्वी लावलेल्या ६८९ देशी झाडांच्या वृक्षांची आळे करण्यात आली. तसेच अंजनगाव परिसरातील वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी व पर्यावरण रक्षणासाठी गाव परिसरातील व सोमेश्वर विद्यालय वृक्षांना आळे करण्यात आली

क) ग्राम परिसराची स्वच्छता:

'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमासाठी गावातील मंदिर, ग्रामदैवत मंदिर परिसर स्वच्छता, सोमेश्वर हायस्कूल शाळेचे मैदान, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आदी परिसर प्लॅस्टिक मुक्त तसेच कऱ्हा नदी काठावरील काटेरी झुडपे, गवत इत्यादी नष्ट करून शिबीरार्थी विद्यार्थ्यांनी 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत गावाचे चित्र बदलून टाकले. तसेच ग्रामदैवत मंदीर परिसरातील व रस्त्याच्या कडेचे दगड, गवत, सपाटीकरण, अनावश्यक काटेरी झाडे तोडणे इ. प्रकारची कामे शिबीरादरम्यान स्वयंसेवकांनी केली.

ड ) स्मशान भूमी स्वच्छता, सुशोभीकरण उपक्रम

अंजनगाव परिसरात कऱ्हानदी पात्रात असणाऱ्या स्मशानभूमी पर्यंत जाण्यासाठी असणारा ५०० मीटर रस्ता चिखल व गाळ साठल्याने चालण्यायोग्य राहिला नव्हता. तिथं रस्त्यावरील चिखल व गाळ बाजूला करून रस्ता व्यवस्थित करून देण्यात आला. आसपासच्या परिसरात वडाचे वृक्षारोपण करण्यात आले तसेच परिसरात शोभीवंत झाडे लावून परिसर सुशोभित करण्याचा प्रयत्न करण्यात आला .

BARAMATI
TULJARAM CHATURCHAND COLLEGE

## २. संस्कार

अ) व्याख्यानाचे आयोजन:

शिबीर काळात खालील मान्यवरांनी शिबीरार्थीना मौलिक मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाचा शिबीरार्थीना भविष्यकाळात निश्चित फायदा होईल.

| अ.क्र. | व्याख्याता | विषय | दिनांक | लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| 1. | प्रा. सुरश्री सोनवणे | वृक्षारोपण आणि संवर्धन | २१/१२/२०२३ | २०० |
| 2. | डॉ. राजेंद्र ढाकलकर | दंतचिकित्सा | २१/१२/२०२३ | २५० |
| 3. | श्री. गणेश शिंदे | शासकीय प्रशासकीय कामकाज | २२/१२/२०२३ | ७०० |
| 4. | प्रा. अच्युत शिंदे | युवक ग्रामीण स्वप्न | २२/१२/२०२३ | २४० |
| 5. | प्रा. राजू पांडे | लोकशाही बळकट करण्यासाठी तरुणांची भूमिका | २३/१२/२०२३ | १७५ |
| 6. | डॉ. अरुण मगर | आयक्युएसीमध्ये तरुणंचे योगदान | २४/१२/२०२३ | २५० |
| 7. | डॉ. शशिकांत नकाते | कृषी पर्यटन | २५/१२/२०२३ | ३०० |

ब) योग प्रशिक्षण :

शिबीर काळामध्ये शिबीरार्थी विद्यार्थांना रोज स. ६ ते ७ योग साधनेचे प्रशिक्षण योग प्रशिक्षक श्री. धनंजय केळकर यांच्या मार्फत देण्यात आले तसेच रोज सकाळी प्रार्थना ७ ते ८ प्रार्थना, परिपाठ करुन दिवसभाराच्या कामकाजचे नियोजन सांगण्यात येत होते.

क) जैविक विविधता निरीक्षण –

अंजनगाव परिसरातील जैविक विविधतेचा निरीक्षण करणे व त्यांच्या अभ्यासासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे या उद्देशाने शिबिरार्थीना जैविक विविधता निरीक्षण फेरीसाठी अंजनगाव येथील कऱ्हा नदी काठ परीसर व गावात शिवार फेरीच्या माध्यमातून नेण्यात आले. शिबिरार्थी विद्यार्थीनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेवून तसेच शेती मध्ये जावून शेतकऱ्यांशी चर्चा केली. खुला गोठा, त्याच्यातून होणारे फायदे या विषयीची माहिती घेतली. पर्यावरणशास्त्र विभागाचे विभागप्रमुख कु. प्रा. सुरश्री सोनवणे यांनी शिबिरार्थीना जैविक विविधतेतील निरीक्षण कसे करावे या बाबतीत मार्गदर्शन केले.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

ड) जनजागृती करणे:

जनजागृती करण्यासाठी गावामध्ये रॅलींचे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने लोकसंख्या नियंत्रण काळाची गरज, लोकशाही बळकट करण्यासाठी सक्रिय सहभाग, बेटी बचाव, वृक्ष लागवड व संवर्धन ग्रामस्वच्छता आरोग्य व विविध महत्वपूर्ण विषयी जनजागृती (शौचालय वापर, व्यसन मुक्ती), सेंद्रिय शेती या विषयाबाबत जनजागृती करण्यात आली. विद्यार्थ्यांनी गावातील प्रत्येक घरांमध्ये जावून शासकीय योजना व त्या विषयी लागणारे कागदपत्रे त्यासंदर्भात माहिती देवून गावकऱ्यांचे प्रबोधन केले.

३) आरोग्य

अ) संपूर्ण आरोग्य चिकित्सा शिबीर:

बारामती येथील निरामय फाउंडेशन यांच्या मार्फत डॉ. श्रीकांत देशपांडे यांच्या उपस्थितीमध्ये शिबीरार्थी, मौजे अंजनगाव येथील ग्रामस्थ यांना संपूर्ण आरोग्य निदान शिबीर व त्या संबंधीचे मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमासाठी ग्रामस्थांची उपस्थिती विशेष उल्लेखनीय होती. या शिबीराचे उद्घाटन मा. प्राचार्य डा. अविनाश जगताप, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती यांच्या हस्ते करण्यात आले तसेच या शिबीराचा समारोप समारंभ शिबीरार्थी व ग्रामस्थांच्या वतीने डॉ. चंद्रकांत कांबळे यांनी आभार मानले.

ब) दंत चिकित्सा शिबीर:

बारामती येथील दंतचिकित्सक डॉ.राजेंद्र दोषी–हाकाळकर यांच्या उपस्थितीमध्ये शिबीरार्थी, मौजे अंजनगाव येथील ग्रामस्थ यांना दाताची निगा व त्या संबंधीचे मार्गदर्शन करण्यात आले या उपक्रमासाठी ग्रामस्थांची उपस्थिती विषेष उल्लेखनीय होती.

४) अभिनव उपक्रम:

अ) विरंगुळा (सनसेट सेल्फि पॉईंट):

अंजनगाव परिसरातील सामाजिक वणीकरणाच्या जागेत असणाऱ्या पाझर तलावाचे रूंदीकरण व सुशोभीकरण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने २०१८ पासून करण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून यावर्षी पाझर तलावाच्या भरावावर स्वच्छता व काटेरी झुडपे काढून परिसराचे सुशोभिकरण करण्यात आले.

ब) हळदीकुंकू (स्मार्ट सुनबाई):

स्मार्ट सुनबाई (हळदीकुंकू) या कार्यक्रमाचे आयोजन करून मौजे अंजनगाव येथील महिलांबरोबर शिबीरार्थींनी संवाद साधला. त्याचबरोबर या संवादाचे माध्यमातून शौचालय असणे आरोग्याचे दृष्टीने किती महत्वाचे आहे हे पटवून देण्यात आले. त्याचबरोबर स्त्री आरोग्य संदर्भात चर्चा देखील झाली. महिलांनी यामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या कार्यक्रमात सहभागी महिलांना एक एक भेटवस्तू भेट देवून, सांडपाण्याच्या व्यवस्थापनासाठी परसबाग निर्माण करावी अशी विनंती करण्यात आली व नेथे लेकीचं झाड लावावे अशी विनंती शिबीरार्थींनी केली. त्याचबरोबर स्मार्ट सुनबाई हा खेळ (फनिगेम) रा. से. यो. माजी विद्यार्थी श्री. सोमनाथ कदम यांनी आयोजित केला. त्यास महिला ग्रामस्थाना उस्फूर्त प्रतिसाद दिला. विजेत्या महिला ग्रामस्थांसाठी महाविद्यालया तर्फे स्मार्ट सुनबाई पैठणी देवून सन्मानित करण्यात आले.

क) अंजनगाव सामाजिक–आर्थिक– राजकीय व्यवस्थेचा अभ्यास सर्वेक्षण

अंजनगाव सामाजिक–आर्थिक– राजकीय व्यवस्थेचा अभ्यास सर्वेक्षण करण्यासाठी गावामध्ये शिबर्थिंचे गट करून प्रत्येको तीन घरांची माहिती सर्वेक्षण प्रश्नावलीच्या माध्यमातून गोळा करण्यात आले. सदर सर्वेक्षण साठी लागणारी प्रश्नावली समाजशास्त्र विभागाचे प्रा. राजू पांडे यांनी तयार केली. यामध्ये अंजनगाव सामाजिक–आर्थिक– राजकीय व्यवस्थेचा अभ्यास व शासनाच्या विविध योजनेचा लाभार्थी तसेच त्यानी माहिती व जनजागृती करण्यात आली . शिबिरार्थींनी गावात काय बोलायचे सर्वेक्षण करताना माहितो कशी मिळवाबी या विषयाची कार्यशाळा समाजशास्त्र विभागाचे प्रा. राजू पांडे यांनी घेतली. सदर उपक्रमात ५१७ घरनी माहिती गोळा करण्यात आली. संख्याशास्त्र विभागात पुढील विश्लेषणासाठी सदर माहिती देण्यात आली

क) विविध गुणदर्शन मार्गदर्शन प्रशिक्षण :

शिबिरार्थींमधील विविध गुणदर्शन करण्याची संधी व त्याची योग्य माहिती व मार्गदर्शन करण्यासाठी आपल्याच महाविद्यालयातील कनिष्ठ विभागातील प्रा. विशाल मोरे व श्री. सोमनाथ कदम माजी विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजना, यांनी एकपात्री प्रयोग, पथनाट्य, मकअभिनय, नृत्य (सामुहिक व एकपात्री) यांचे विशेष व्याख्यान व प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

**५) सांस्कृतिक कार्यक्रम:**

शिबिरार्थी आणि मौजे अंजनगाव येथील युवकांच्या संयुक्त विद्यमाने पंचक्रोशीतील ग्रामस्थासाठी जनजागृती आणि प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. यामध्ये लोकगीते, विनोदी नाटीका, प्रबोधनपर पथनाट्य यासारख्या कार्यक्रमाचे माध्यमातून सामाजिक प्रश्न अंधश्रध्दा व इतर वाईट प्रथा यावर विशेष भर देण्यात आला या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन प्रा.विशाल मोरे व सुत्रसंचालन श्री. सोमनाथ कदम यांनी केले. तर आलेल्या मान्यवरांचे, ग्रामस्थांचे व शिबीरार्थीचे आभार डॉ. विलास कर्डिले यांनी मानले.

**६) समारोप समारंभ:**

शिबीराचा समारोप दि. २७ जानेवारी २०२३ रोजी प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. समारंभास प्रमुख पाहुणे मा. सरपंच सौ. प्रतिभाताई परकाळे, मा.श्री. दिलीप परकाळे,श्री. सुभाष वायसे, म्हणून उपस्थित होते तर विशेष उपस्थितीमध्ये उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, मा. प्रदीप वायसे, उपसरपंच, उद्योजक सुरेश परकाळे, श्री. दादासाहेब मोरे, संचालक, सोमेश्वर कारखाना, श्री. सुभाष परकाळे, श्री. मिलिंद मोरे व सर्व आजी–माजी पदाधिकारी, समस्त ग्रामस्थ अंजनगाव, सौ. मिनाज मुलाणी , ग्रामसेवक, उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. या विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या यशस्वीतेसाठी शिबीर प्रमुख डॉ.विलास कर्डिले (जिल्हा समन्वयक रा.से.यो.व कार्यक्रम अधिकारी) कार्यक्रम अधिकारी डॉ.चंद्रकांत कांबळे,डॉ निरंजन शाह , सहयोगी कार्यक्रम अधिकारी प्रा. अस्मिता भगत, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व समिती सदस्य यांनी विशेष प्रयत्न केले.

**७) शिबीरस्थळास मान्यवरांची भेट:**

शिबीर काळात डॉ. अरूण मगर, डॉ सीमा नाईक–गोसावी, डॉ. प्रतिभा जावळे, प्रा. रणजित पंडित, डॉ. मोहिते, , प्रा.महेश फुले,डॉ. देविदास भोसले, श्री. अनिकेत गंगावणे यांनी सदिच्छ भेट देवून शिबीरार्थींचे मनोबल वाढवले.

BARAMATI TULJARAM CHATURCHAND COLLEGE

## ८) शिबीराचे ठळक वैषिष्टये:

१) अंजनगाव सामाजिक–आर्थिक– राजकीय व्यवस्थेचा अभ्यास सर्वेक्षण करून ५१७ घरांची माहिती संकलित करण्यांत आली.

२) ६८२ पेक्षा जास्त वृक्षांना आळी केली.

३) मंदिर, शाळेचे मैदान, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आदी परिसर स्वच्छ करण्यात आला.

४) महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले.

५) समाज प्रबोधनासाठी रॅली, पथनाट्याचे आयोजन.

६) योग प्रशिक्षण स्वयंसेवकांना दिले.

७) अनेक मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्यात आली.

८) शिबीराच्या माध्यमातून शिबिरार्थींना सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून पूरक ठरला.

९) स्वंयसेवकांना सामाजिक प्रश्नांची जाणीव होवून, समाज कार्यामध्ये त्यांनी सक्रीय योगदान दिले.

१०) समाजातील अनेक प्रश्नांबाबत जनजागृती करून ते सोडविण्यासाठी मार्गदर्शन, मदत, जनजागृती करण्यात आली.

९) शिबीर काळातील छायाचित्रे:

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI


**उद्घाटन समारंभ**




**ग्रामस्वच्छता**

| श्रमदान अगोदर | श्रमदान करताना | श्रमदाना नंतर |
|---|---|---|
|  |  |  |

**स्मशानभूमी परिसर स्वच्छ करताना**

| श्रमदाना अगोदर | श्रमदान करताना | श्रमदाना नंतर |
|---|---|---|
|  |  |  |

**वृक्षसंवर्धन**

| श्रमदाना अगोदर | श्रमदान करताना | श्रमदाना नंतर |
|---|---|---|
|  |  |  |







रस्ता दुरुस्ती व साईड पट्टी निर्मिती

श्रमदाना अगोदर



श्रमदान करताना



श्रमदाना नंतर



संपूर्ण आरोग्य निदान



हळदीकुंकू स्मार्ट सूनबाई



योग अभ्यास व परिपाठ



शिबीरकाळातील व्याख्याने





शिबीरकाळात मान्यवरांच्या भेटी









TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati